महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टिफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / फ्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६५ वा | शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# घरात चिखल, शेतात उध्वस्त पिकं; पूरबाधितांचा संसार उभा करण्यासाठी धडपड

## सोलापूरात पूर ओसरला; मदतकार्यास वेग, पण पुन्हा जोरदार पावसाची शक्यता

**सोलापूर (सचिन जाधव):-** सोलापूर जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये आलेल्या महापुराचे पाणी आता हळूहळू ओसरू लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून कोसळलेल्या अविरत पावसानंतर शुक्रवारी काही ठिकाणी ऊन दिसल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र, नुकसानीचे विदारक चित्र उघड होत असून संसार उभा करण्यासाठी नागरिकांना पुन्हा कष्ट करावे लागत आहेत.

करमाळा, माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूरसह



अनेक तालुक्यांमध्ये सीना व भीमा नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांचे घरदार उद्ध्वस्त झाले. घरात चिखल, पाण्यात कुजलेले साहित्य, फर्निचर व अन्नधान्य नष्ट झाल्याने बाधितांची स्थिती दयनीय

### पुन्हा रेड अलर्टची भीती

मात्र दिलासा देणाऱ्या या घडामोडींमध्येही पुन्हा संकटाची चाहूल आहे. हवामान खात्याने शनिवारी व रविवारी सोलापूर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. शुक्रवारी सकाळपासूनच पुन्हा मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून शहरासह ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी ओढे, नाले व तलाव तुडुंब भरून वाहत आहेत.

पूर ओसरल्याने जनजीवन पूर्ववत होण्यास सुरुवात झाली असली तरी विदारक नुकसानीमुळे बाधितांना सावरायला वेळ लागणार आहे. पुढील दोन दिवसांचा पावसाचा अंदाज लक्षात घेता प्रशासन व नागरिकांची चिंता वाढली आहे. सरकारकडून मदतीची अपेक्षा वाढली असून, बळीराजावर आलेल्या या संकटात ठोस उपाययोजना आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

झाली आहे. अनेकांनी डोळ्यांतील पाणी पुसत, उरलेले थोडेफार सामान वाचवण्याची धडपड सुरू केली आहे.

### शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक आघात

या पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. काळ्या मातीतील खरीप हंगामाचा उद्ध्वस्त झालेला पिकांचा पट्टा पाहून शेतकऱ्यांचे हृदय पिळवटून निघाले आहे. पै-पै साठवून संसार उभा करणाऱ्या ग्रामीण भागातील कुटुंबांचे अस्तित्वच डळमळीत झाले आहे. "निसगार्पुढे काही चालत नाही" असे हतबलपणे सांगत शेतकरी प्रशासनाकडे तातडीने मदतीची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

### वाहतूक हळूहळू पूर्वपदावर

पूरामुळे ठप्प झालेली वाहतूक हळूहळू पूर्वपदावर येत आहे. सोलापूर-पुणे महामार्गावरील वाहतूक संथ गतीने सुरू झाली असून रेल्वेसेवाही पूर्ववत सुरू झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा श्वास सोडला. मात्र, सोलापूर-विजयपूर महामार्ग अद्याप बंद आहे.

### प्रशासन व संस्थांचा मदतीसाठी धाव

एनडीआरएफच्या पथकांसह लष्कराने बचाव व मदतकार्याला गती दिली आहे. आतापर्यंत १२९ गावे पाण्याने वेढली असून हजारो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. विविध सामाजिक संस्था, संघटना आणि कार्यकर्ते बाधितांना अन्न, पाणी व आवश्यक साहित्य पुरवण्यासाठी पुढे सरसावले आहेत. दरम्यान, मंत्री व विरोधी पक्षनेते यांनी दौरे करून नागरिकांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

## जिल्हास्तरीय नैसर्गिक आपत्ती मदत कक्ष व तालुकास्तरीय कक्षाची स्थापना-जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त व पूर परिस्थितीमुळे पुरग्रस्त नागरिकांना आवश्यक ती मदत करण्यासाठी जिल्हा प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचे वतीने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, सात रस्ता, शासकीय दुध डेअरी शेजारी सोलापूर येथे नैसर्गिक आपत्ती मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. तर तालुक्याच्या ठिकाणी तालुकास्तरीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून ज्या दानशूर व्यक्ती, संस्था, संघटना यांना पूरग्रस्त बाधितांना मदत करावयाची आहे त्यांनी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय मदत कक्षाशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार



आशीर्वाद यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नुकसानग्रस्त व पुरग्रस्तांच्या सार्वजनिक हितासाठी नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध व्हाव्यांत या उद्देशाने मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला असून, मदत कक्षामार्फत आवश्यक ती मदत करुन बाधित नागरिकांचे प्रश्न तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागांशी संपर्क साधून सोडविण्यात येतील. या मदत कक्षाच्या माध्यमातून ४४ बाधित गावांपैकी कोणत्या गावाला कोणत्या प्रकारची मदतीची आवश्यकता आहे याची माहिती दिली जाणार आहे त्यामुळे गरजू बाधितग्रस्तांना केलेली मदत तात्काळ देणे सोयीचे होणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. तसेच पूरग्रस्त यांना मदत करण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### जिल्हास्तरीय मदत कक्ष अधिकारी व संपर्क क्रमांक :-

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला असून जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार श्री. सैपन नदाफ मोबाईल क्रमांक 83799 81799 तर दूरध्वनी क्रमांक 0217-2990140 यावर संपर्क साधावा.

### तालुकास्तरीय मदत कक्षाचे अधिकारी व संपर्क क्रमांक:-

उत्तर सोलापूर तालुक्यात श्री सुधाकर बंडगर, निवडणूक नायब तहसिलदार, मोबाईल क्रमांक 9881741311, कार्यालयीन क्रमांक 0217-2731014; माढा तालुक्यात श्री प्रितम पवार, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक 9970827574, कार्यालयीन क्रमांक 02183-234031; करमाळा तालुक्यात श्री शतुघ्न चव्हाण, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक 8805907686, कार्यालयीन क्रमांक 02182-220535; बार्शी तालुक्यात श्री संतोष गुलाब शिंदे, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक 9518562532, कार्यालयीन क्रमांक 02184-222213; अपर तहसिल मंद्रुप येथे श्री नवल सरवळे, सहा. महसूल अधिकारी, मोबाईल क्रमांक 9309597368; दक्षिण सोलापूर तालुक्यात श्री विनायक कुलकर्णी, निवडणूक नायब तहसिलदार, मोबाईल क्रमांक 9423331657, कार्यालयीन क्रमांक 0217-2731033; तर मोहोळ तालुक्यात श्रीमती सोनाली निटुरे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, मोबाईल क्रमांक 9022008681, कार्यालयीन क्रमांक 02189-232234. नागरिकांनी पूरग्रस्त मदतीसाठी संबंधित तालुक्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**सोलापूर जिल्हयातील पूरग्रस्त बाधीत कुटुंबाना शासना तर्फे किट वाटप करण्यात येत आहे. या किट मध्ये खालील वस्तूंचा समावेश आहे**

ज्वारीचे पीठ, आटा, हरभरा दाळ, स्वयंपाक तेल, मीठ, तिखट मसाला, हळद, दूध पावडर, मेणबत्ती पाकीट मध्यम आकाराचे, मच्छर आगरबत्ती, काडीपेटी, टॉर्च विथ बॅटरी, इमरजन्सी लाईट,अंगाचे साबण, प्लास्टीक ताडपत्री, चादर, सतरंजी तसेच पातेला, तवा, ताट, तांबे, वाटी, चमचा, ग्लास, उलतन, पक्कड/सांडशी, पळी ( आमटी वाढण्यासाठी), प्लास्टीक बकेट अशा आवश्यक मूलभूत वस्तूंचा समावेश आहे.

या वस्तूंनाच अधिक प्राधान्य असून याव्यतिरिक्तही व्यक्ती, सामाजिक संस्था पूरग्रस्त बाधित नागरिकांना जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या जिल्हास्तरीय मदत कक्ष व तालुकास्तरीय मदत कक्ष यांच्याकडे मदत देऊ शकतात, असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.


विकणे /भाड्याने देणे आहे

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


## दक्षिण सोलापूर तालुका शिक्षक संघाचा 'आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार' जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडी यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा "आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार" तसेच आदर्श शाळा, गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार यंदासाठी जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे हे १३ वे वर्ष असून कार्यक्रम रविवारी, दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता जुळे सोलापूर येथील कटगेरी मंगल कार्यालयात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापुरे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार तथा सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने उपस्थित राहणार आहेत. राज्य संघाचे ज्येष्ठ सल्लागार बाळासाहेब काळे अध्यक्षस्थानी असतील. सेवानिवृत्त शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष शिवानंद भरले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन होणार आहे.

शिक्षक संघाचे अध्यक्ष महिबूबसाब सवार व मंद्रूप पतसंस्थेचे चेअरमन दयानंद वठारे यांनी ही माहिती प्रसिद्धीस दिली.

गुणवंत शिक्षकांचा गौरव-तालुक्यातील एकूण १३ केंद्रातून प्रत्येकी एक, अक्कलकोट तालुक्यातील १, उर्दू व कन्नड अशा एकूण १६ गुणवंत शिक्षकांचा या पुरस्काराने गौरव होणार आहे. त्याचबरोबर एक केंद्रप्रमुख, एक शिक्षण विस्तार अधिकारी, दोन गुणवंत कर्मचारी व चार आदर्श शाळा यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांमध्ये- निजामुद्दीन अहमदअली आतार (रेल्वे कॉलनी, केंद्र-होटगी),श्रीम. प्रियांजली श्रीशैल मंगरूळे (बंकलगी-तांडा, केंद्र-आहेरवाडी), श्रीम. स्मिता जमदाडे-कोरे (चिंचपूर, केंद्र-बरूर), चंद्रशेखर चितली (विडी-घरकुल अ मुली, केंद्र-कुंभारी), अरविंद सुरवसे (वडजी, केंद्र-उळे),श्रीम. अंजली कोळी (वडकबाळ, केंद्र-हत्तुर), श्रीम. कमल आणची (नाईकनगर, केंद्र-मंद्रूप), गिरमल्ला कोरे (लवंगी, केंद्र-माळकवठे), परशुराम कंजारे (गुंजेगाव, केंद्र-कंदलगाव), धीरज राठोड (तेलगाव, केंद्र-भंडारकवठे), विश्वनाथ कटारे (कन्नड मुलांची शाळा, वळसंग),नागनाथ बिराजदार (इंदिरा नगर दर्गनहळ्ळी, केंद्र-धोत्री), नरू चव्हाण (तांदुळवाडी, केंद्र-मुस्ती),श्रीम. नाजिश बाशा हन्नूरे (उर्दू झ्र कुंभारी), चंद्रकांत स्वामी (कन्नड झ्र होटगी), सौ. अंबुजा बिराजदार-बोरगावकर (कन्नड झ्र म्हैसलगे, अक्कलकोट) यांचा समावेश आहे.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान-केंद्रप्रमुखः गुरुलिंग व्हनमाने (केंद्र-मुस्ती),शिक्षण विस्तार अधिकारीः अयुब कलबुर्गे (बीट-मंद्रूप) गुणवंत कर्मचारीः किरणकुमार शिंदे (वरिष्ठ सहाय्यक, बीआरसी द. सोलापूर),श्री. (पान 2 वर..)

## राज्यातील 22 जिल्ह्यांना 'रेड अलर्ट'



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या आठ दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातल्यानंतर पुन्हा शनिवार व रविवारी हवामान खात्याने सोलापूर, पुणे व धाराशिवसह २२ जिल्ह्यांना 'रेड अलर्ट' दिला आहे. सीना नदीस आलेल्या पुराने धास्तावलेल्या नागरिकांना या रेड अलर्टने पुन्हा धडकी भरली आहे.

पुरामुळे नदीकाठावरील व गावात पाणी शिरल्याने आठ हजाराहून अधिक नागरिकांना निवारा केंद्रात स्थलांतर करावे लागले आहे. यामुळे पुढील दोन दिवसांत मोठा पाऊस झाल्यास आणखी मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने २७ व २८ सप्टेंबर हे दोन दिवस रेड अलर्ट दिलेला असून, सोलापूर जिल्ह्यात शनिवारी दुपारी दोनपासून ते रविवारी सकाळी ६ वाजेपर्यंत रेड अलर्ट दिला आहे. शेजारील पुणे जिल्ह्यात शनिवारी दुपारी २ ते रात्री ८ तर रविवारी पूर्ण दिवस रेड अलर्ट जारी केला आहे.

नांदेड - मराठवाड्यात गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही भागात अजूनही पूरस्थिती कायम आहे. दरम्यान, दोन-तीन दिवसांच्या खंडानंतर काही भागांत शुक्रवारी पाऊस झाला. नांदेड शहरात सकाळपासून रिमझिम सुरू असलेल्या पावसाने सायंकाळी काही काळासाठी जोर धरला. पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले.

विष्णुपुरी धरणाऱ्या १६ दरवाजांतून एक लाख क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने गोदावरी नदीला पूर कायम आहे. नदीकाठच्या काही भागांना या पुराचा वेढा आहे. जिल्ह्यात शनिवारी (ता. २७) पावसाचा ऑरेंज अलर्ट जाहीर झाला आहे. प्रशासन पावसाच्या स्थितीवर लक्ष ठेऊन आहे.

धाराशीव जिल्ह्याच्या काही भागांमध्ये गुरुवारी रात्री तर आज पहाटे अनेक भागांत पावसाने हजेरी लावली. तुळजापूर तालुक्यातील सलगरा (दिवटी) महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. या मंडळात १३७.५ मिलिमीटर पाऊस झाला.

### असा आहे इशारा...

- शनिवार, २७ सप्टेंबर
- सकाळी ८ ते दुपारी २ : नांदेड व लातूर
- दुपारी २ ते रात्री ८ : सोलापूर, पुणे, धाराशिव व लातूर
- रात्री ८ ते मध्यरात्री १२ : सोलापूर, धाराशिव, बीड, अहिल्यानगर
- रविवार, २८ सप्टेंबर
- मध्यरात्री १२ ते सकाळी ६ : सोलापूर, पुणे, सातारा, बीड, अहिल्यानगर
- सकाळी ६ ते दुपारी १२ : पुणे, बीड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर
- दुपारी १२ ते सायंकाळी ६ : पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिवमध्ये पाऊस


निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर


## सीना नदीला पुन्हा पुराचा धोका

### नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दोन दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाचा जोर आजपासून पुन्हा वाढणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार आज राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता आहे. दरम्यान, सकाळपासूनच सोलापूर शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसाला सुरुवात झालीय.

पावसाची संततधार सुरूच आहे. यामुळे सीना नदीला पुन्हा महापूर येण्याची भीती व्यक्त करण्यात येतेय. पंढरपूरला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

पंढरपूरमध्ये पुन्हा अतिवृष्टीचा अंदाज आहे. यामुळे सीना नदीला पुन्हा पूर येण्याचा धोका आहे. अतिवृष्टी झाली तर सीना कोळेगाव धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला जाऊ शकतो. यामुळे सीना नदीच्या पात्रात पाणी पातळी वाढेल. परिणामी पुन्हा भीषण पूरस्थितीचा सामना सीना नदीकाठच्या लोकांना करावा लागेल. या



पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदी काठच्या गावांमधील नागरिकांना सावधानतेचा इशारा दिलाय.

सोलापुरात दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यानं पूर ओसरायला सुरुवात झाली होती. अनेक गावांमधील ५ ते ६ फुटांपेक्षा जास्त पाणी कमी झालं होतं. दरम्यान, आता पावसाचा जोर पुन्हा वाढल्यानं नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सोलापूरसह मराठवाड्यात येत्या चार दिवसात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

गेल्या दहा दिवसात अतिवृष्टीने सोलापूरसह मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात मोठी जीवितहानी आणि पशुधनाचं नुकसान झालंय. सोलापुरात मंगळवारी अभूतपूर्व अशी स्थिती निर्माण झाली होती. पुरामुळे शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालंय. घरांमध्ये पाणी घुसलंय, शेती खरडून गेलीय. बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. पुरामुळे हजारो लोकांचं स्थलांतर करण्यात आलं आहे. अजूनही जिल्ह्यातले ५० पेक्षा जास्त गावांना जोडणारे रस्ते बंद आहेत. यामुळे सुरक्षित स्थळी हलवलेल्या नागरिकांना अजून काही दिवस बाहेरच मुक्काम करावा लागेल.

## संपादकीय

# सरकारच्या नियत व नितीचा पर्दाफाश

सोलापूर, मराठवाडा, जिथे पारंपरिकपणे कोरडा दुष्काळ पडतो, तिथे यंदा पावसाने कहर केला आहे. नद्या त्यांच्या सीमांमधून बाहेर पडल्या, जमिनींची माती वाहून गेली, घरं आणि जनावरांचं नुकसान झालं. शेतीचं तर मुळासकट नुकसान झालं आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची मागणी अगदी सोपी आणि रास्त होती. ओला दुष्काळ जाहीर करा आणि भरीव मदत द्या.

**पण सरकारनं काय केलं ?**

मुख्यमंत्र्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीला बगल दिली. आणि म्हणाले, "नियमानुसार भरपाई दिली जाईल". पण हे नियम काय सांगतात आणि यात शेतकऱ्यांना काय खरं मिळणार आहे, हे समजून घेतल्यावर सरकारने कसा 'गेम' केला आहे, ते स्पष्टपणे दिसतं.

निकष बदलले... आणि पुन्हा मागे घेतले !

मार्च 2023 मध्ये ठरवलेले नियम म्हणतात की:

- जिरायत (कोरडवाहू) शेतीसाठी: ₹8,500 प्रति हेक्टर
- बागायती शेतीसाठी: ₹17,000 प्रति हेक्टर
- मर्यादा: केवळ 2 हेक्टरपर्यंत मदत

यानंतर जानेवारी 2024 मध्ये थोडं जागं होऊन सरकारने निकष सुधारले:

- जिरायतीसाठी ₹13,600 आणि बागायतीसाठी ₹27,000 प्रति हेक्टर
- आणि मदतीची मर्यादा 3 हेक्टरपर्यंत वाढवली

शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकायच्या आधीच सरकारने मे 2025 मध्ये अचानक निर्णय घेतला की खरिप हंगाम 2025 पासून पुन्हा जुन्याच निकषांनुसार (मार्च 2023) मदत दिली जाईल.

याचा अर्थ सरकारने आधी मदत वाढवून जाहीर केली, लोकांनी त्यावर विश्वास ठेवला, आणि मग निवांतपणे त्या निर्णयाला पलटी मारली.

वास्तविक मदत की निव्वळ थट्टा ?

हे आकडे पाहा:

- एक हेक्टर म्हणजे 2.5 एकर (100 गुंठे)
- 8500 रुपये प्रति हेक्टर म्हणजे प्रति गुंठा फक्त ₹85 मदत
- सोयाबीनसारख्या पिकांचा उत्पादन खर्च प्रति एकर सुमारे ₹25,000
- म्हणजे एका हेक्टरचा खर्च होतो ₹62,500
- आणि सरकार देणार फक्त ₹8,500

54000 रुपयांचे नुकसान आणि भरपाई फक्त 8500 रुपये हाच का "शेती समर्थ भारत" चा अजेंडा ?

नियत आणि नियोजन दोन्ही ढासळलेले

शेतकऱ्यांचं अर्थशास्त्र नोकरदारांसारखंच आहे. फिक्स इन्कम नाही. शेतीतून मिळालेल्या उत्पन्नावर त्याचं संपूर्ण वर्ष अवलंबून असतं, शिक्षण, सण, आरोग्य, लग्न कार्य, कर्जाचे हप्ते सगळं.

एक हंगाम गेला, की पुढचं वर्ष कर्जात आणि मानसिक तणावात जातं.

हे सरकार एकीकडे "शेतमालाला उत्पादन खर्चाच्या आधारावर भाव देतो" असं म्हणतं, पण जेव्हा शेतीचं नुकसान होतं, तेव्हा उत्पादन खर्चावर आधारलेली भरपाई द्यायला त्यांची नियतच साफ दिसत नाही.

**मुख्यमंत्र्यांचं आवाहन आणि सोशल मीडियाची उपहासात्मक मागणी**

मुख्यमंत्री म्हणतात की आमदार, खासदार आणि मंत्र्यांनी एका महिन्याचा पगार पूरग्रस्तांसाठी द्यावा.

पण सोशल मीडियावर लोक म्हणत आहेत – "पगार नको, एका महिन्याच्या टक्केवारीचा १% जरी दिला, तरी ती रक्कम हजारो कोटींच्या पुढे जाईल!"

ही फक्त उपहासात्मक टीका नाही, ती शासनाच्या ढोंगी संवेदनशीलतेवर मारलेली चपराक आहे.

**शेतकऱ्यांना मदतीऐवजी धोका!**

या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारने जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना धोका दिला आहे, असं म्हणायला काही हरकत नाही. एकीकडे शेतकरी संकटात आहेत, आणि दुसरीकडे सरकार केवळ आकड्यांचा खेळ खेळत आहे.

तुटपुंजी भरपाई, निकषांमधील पलटी, आणि ओल्या दुष्काळाच्या घोषणेला बगल हे सगळं शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी घातक आहे.

शेवटी एकच प्रश्न शेतकऱ्यांसाठी सरकार आहे की आकड्यांसाठी ?

जर सरकारला खरंच शेतकऱ्यांच्या कल्याणाची चिंता असेल, तर:

- उत्पादन खर्चावर आधारित भरपाई द्यावी
- वाढवलेले निकष कायम ठेवावेत
- ओला दुष्काळ त्वरित जाहीर करावा
- आणि शेतकऱ्यांशी प्रामाणिकपणे संवाद साधावा

नाहीतर 'शेती समर्थ भारत' हे केवळ पोस्टरवर आणि जाहिरातींमध्येच दिसणार आहे. शेतकऱ्याच्या शेतात नव्हे.

पान १ वरून

## 'सोलापूर जिल्ह्यात दोन...

म. चिंचोळे (कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, जि.प. सोलापूर).

आदर्श शाळांचा गौरव- जि.प. प्राथमिक शाळा, नांदणी (बीट-होटगी), जि.प. प्राथमिक उर्दू शाळा, विडी घरकुल (बीट-कुंभारी), जि.प. प्राथमिक शाळा, येळेगाव (बीट-मंद्रूप), जि.प. प्राथमिक शाळा, धोत्री (बीट-वळसंग)

या कार्यक्रमाला बाळासाहेब शेळके, उत्तमराव जमदाडे, जयश्री सुतार (गटशिक्षणाधिकारी), सरस्वती भालके (जिल्हाध्यक्ष महिला आघाडी), अंबुताई इतापे (सरचिटणीस), वीरभद्र यादवाड (अध्यक्ष जिल्हा शिक्षक संघ), शिवाजी पाटील (संचालक पतसंस्था), राजकुमार बिज्जरगी, रेवणसिद्ध हत्तुरे, रामभाऊ यादव, सिद्राम कटगेरी, सैपन आळगी, गुरुबाळ सनके, बा. द. मुल्ला, चनमल्लप्पा चिट्टे, सुभाष फुलारी, म. हयात पाटील, सतिश वाले, सिद्धराया कोळी, बसवराज खिलारी, हमीदखां पठाण, पुंडलिक कलखांबकर, रब्बीलाल मुल्ला, शंकर बिराजदार, प्रकाश कुंभार, शांतप्पा कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील रंगभरण स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

# राजा राममोहन रॉय : भारतीय समाजसुधारणेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासाच्या प्रवाहात काही व्यक्तिमत्त्वे अशी घडलेली आहेत, ज्यांनी समाजाला नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची शिकवण देऊन रूढीवादी मानसिकता आणि अंधश्रद्धा दूर करण्याचा मार्ग दाखवला आहे. त्या काळातील भारतीय समाज धार्मिक कुसंस्कार, जातीभेद, स्त्रीविरोधी प्रथा आणि शिक्षणाच्या अभावाने जड होत होता. अशा वातावरणात राजा राममोहन रॉय या दूरदर्शी विचारवंताचा जन्म झाला. त्यांनी आपल्या बुद्धी, धैर्य आणि अपार तर्कशक्तीच्या बळावर भारतीय समाजाला आधुनिकतेच्या मार्गावर नेले. म्हणूनच त्यांना भारतीय पुनर्जागरणाचे जनक असे संबोधले जाते. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कायाचा आढावा घेणे आजही आवश्यक आहे.

**बालपण आणि शिक्षण :**

२२ मे १७७२ रोजी बंगाल प्रांतातील हुगळी जिल्ह्यातील राधानगर या खेड्यात राजा राममोहन रॉय यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय जमीनदार होते आणि आई तारिणी देवी धार्मिक आणि विचारशील व्यक्तिमत्त्वाची होती. बालवयातच राजा राममोहन रॉय अतिशय जिज्ञासू, बुद्धिमान आणि अभ्यासू होते. त्यांनी संस्कृत, फारसी आणि अरबी यांसारख्या पारंपरिक भाषांचा अभ्यास केला. पुढे इंग्रजी, ग्रीक आणि हिब्रू यासारख्या पाश्चात्य भाषाही आत्मसात केल्या. या भाषिक प्राविण्यामुळे त्यांना हिंदू, मुस्लीम आणि खिश्चन धर्मग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करता आला. उपनिषदांचे गहन अध्ययन, कुराणातील तत्त्वज्ञान, बायबलमधील नैतिकता यांचा अभ्यास करून त्यांनी स्वतःची स्वतंत्र आणि तर्कशुद्ध विचारसरणी विकसित केली.

**अंधश्रद्धा आणि जड परंपराविरुद्ध संघर्ष**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय समाज अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, मूर्तिपूजा आणि धर्मांधतेमध्ये अडकलेला होता. या परिस्थितीत समाजात बदल घडविण्याचे काम अतिशय कठीण होते. राजा राममोहन रॉय यांनी या सर्व जडतेला आव्हान दिले. उपनिषदांवर आधारित एकेश्वरवादाचा प्रचार करून त्यांनी धमार्चे खरे स्वरूप लोकांपर्यंत पोहचवले. त्यांचा ठाम विश्वास होता की ईश्वर एकच आहे आणि त्याला जाण्याचा मार्ग सत्य, प्रामाणिकता आणि नैतिकतेतून जातो. मूर्तिपूजा, जातिव्यवस्था किंवा कर्मकांड यांचा खऱ्या धार्मिकतेशी काहीही संबंध नाही.

**सतीप्रथेविरुद्ध निर्णायक लढा :**

भारतीय समाजातील सर्वात अमानुष प्रथा म्हणजे सतीप्रथा, ज्यात पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला जिवंत जाळण्यात येत असे. समाजाने ही प्रथा धार्मिक कर्तव्य मानली होती. राजा राममोहन रॉय यांनी याविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी धार्मिक ग्रंथांचे सखोल अध्ययन करून सिद्ध केले की सतीप्रथा वैदिक दृष्टिकोनातून धर्मसिद्ध नाही. त्यांनी लेख, भाषणे, समाजजागृती आणि इंग्रज प्रशासनाकडे अर्ज करून लोकांना पटवले की ही प्रथा स्त्रीविरोधी आणि अमानुष आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी सतीप्रथा बंदीचा कायदा जाहीर केला. या निर्णयामुळे भारतीय स्त्रियांना जिवंत राहण्याचा अधिकार मिळाला आणि समाजसुधारणेच्या इतिहासात हा क्षण एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

**स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण :**

राममोहन रॉय यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, समाजाची खरी प्रगती स्त्रीशक्तीशिवाय शक्य नाही. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी नव्हती, त्यांचे जीवन घराच्या चौकटीत मर्यादित होते, आणि विधवांचे जीवन अत्यंत दुःखदायक होते. राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांचे हक्क, बालविवाहविरोध, विधवाविवाह यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी मुलींसाठी शाळा उघडल्या, स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार केला, विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजात स्त्रीशिक्षणाची बीजे रुजली आणि स्त्रीसक्षमीकरणाची सुरुवात झाली.

**शिक्षणातील क्रांतिकारी योगदान :**

राममोहन रॉय यांचा विश्वास होता की शिक्षणाशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही. पारंपरिक शिक्षण केवळ धार्मिक ग्रंथांपुरते मर्यादित होते. त्याने आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास, गणित यांचा अभाव होता. राममोहन रॉय यांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांनी कलकत्त्यात इंग्रजी शाळा स्थापन केली, हिंदू कॉलेजमध्ये योगदान दिले, तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणामुळे भारतीय तरुणांना जागतिक ज्ञानाशी जोडले जाईल आणि समाजात नवीन विचारांची ऊर्जा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता.

**ब्रह्म समाज आणि धार्मिक सुधारणे**

१८२८ मध्ये त्यांनी स्थापन केलेला ब्राम्हो समाज एकेश्वरवाद, सामाजिक समानता, स्त्रीसक्षमीकरण आणि धार्मिक सहिष्णुतेवर आधारित होता. ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून मूर्तिपूजा, जातिव्यवस्था आणि अंधश्रद्धा यांचा विरोध केला गेला. स्त्रियांच्या शिक्षणाचे, विधवांच्या हक्कांचे, धार्मिक उदारमतवादाचे संदेश या समाजातून प्रसारित झाले. ब्राम्हो समाजाने भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्याचे संघटित स्वरूप दिले आणि पुढील सुधारकांसाठी प्रेरणास्थान ठरले.

**पत्रकारितेत योगदान :**

राजा राममोहन रॉय यांनी पत्रकारितेतून विचारप्रसार केला. त्यांनी 'संवाद कौमुदी' आणि फारसी नियतकालिक 'मिरात-उल-अखबरह्ल' सुरू केले. या माध्यमातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीविरोधी प्रथा, शिक्षणाचा अभाव यावर लेखन केले. ब्रिटिश प्रशासनाच्या अन्यायकारक धोरणांचा निषेध त्यांनी या माध्यमातून केला. त्यांच्या पत्रकारितेने भारतीय समाजात जनमत घडवले आणि सुधारणा घडवण्यास चालना दिली.

**ब्रिटिश प्रशासनाशी संबंध :**

राममोहन रॉय यांचे ब्रिटिश सत्तेशी नाते जटिल होते. एकीकडे त्यांनी इंग्रजांच्या आधुनिक शिक्षणाचे स्वागत केले, आधुनिक विज्ञान आणि तर्कशास्त्राचा प्रसार केला, तर दुसरीकडे त्यांनी शोषणकारी धोरणांचा निषेध केला. भारतीयांना न्यायालयीन साक्षीदार म्हणून मान्यता मिळावी, मालमत्तेवरील हक्क मिळावेत यासाठी त्यांनी ब्रिटिश प्रशासनाकडे अर्ज केले. १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले आणि तिथे भारतीय समाजाचे प्रश्न मांडले. त्यांनी ब्रिटिश जनतेसमोर भारतीयांच्या हक्कांची बाजू मांडली आणि जागतिक स्तरावर भारतीय समस्यांकडे लक्ष वेधले.

**अंतिम वर्षे आणि निधन :**

इंग्लंडमध्ये कार्यरत असतानाच २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे राममोहन रॉय यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारतीय समाजाने एक महान सुधारक गमावला, पण त्यांच्या विचारांचे तेज आजही समाजाला मार्गदर्शन करते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला आधुनिक शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण, धर्मसहिष्णुता आणि तर्कशुद्ध विचार यांचा साक्षात्कार झाला.

**वारसा आणि आधुनिक संदर्भ :**

राममोहन रॉय यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात आधुनिकतेचे बीज रुजले. स्त्रीसक्षमीकरण, धार्मिक उदारमतवाद, शिक्षणाचा प्रसार, अंधश्रद्धाविरोधी चळवळ आणि पत्रकारितेत स्वातंत्र्य या सर्व गोष्टींमध्ये त्यांचा ठसा आजही दिसतो. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ बंगाल किंवा भारतापुरता मर्यादित नाही; तो जागतिक स्तरावर भारतीय समाजाच्या सुधारणा प्रवाहात देखील महत्त्वाचा ठरतो. आजच्या काळात स्त्रीशिक्षण, लिंगभाव समानता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यावर जे काम चालू आहे, त्यामागे राममोहन रॉय यांच्या दूरदर्शी विचारांचा प्रभाव आहे.

**निष्कर्ष :**

शेवटी, असे म्हणता येईल की, राजा राममोहन रॉय हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी ज्या काळात कार्य केले, त्या काळात त्यांचे विचार क्रांतिकारी होते. सतीप्रथा बंद करणे, स्त्रीशिक्षणाला चालना देणे, बालविवाह व बहुपत्नीत्व विरोधी चळवळीला पाठबळ देणे, ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून धार्मिक उदारमतवादाचा प्रचार करणे, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे आणि पत्रकारितेचा प्रभावी वापर करणे, हे सर्व त्यांच्या दूरदर्शी कायार्चे ठळक उदाहरणे आहेत. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त आपण त्यांचे स्मरण करतो, त्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवतो आणि समाजातील विषमता, अन्याय व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा घेतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# शिस्तीनेच सुखे । होती मजबूत

भारताला महाशक्ती करण्याचं स्वप्नं आमचे थोर नेते पण आज पाहात आहेत. पण त्यांचं स्वप्न दिवास्वप्नच ठरणार आहे. देशात चार उद्योगपती, चारशे शास्त्रज्ञ आणि चार हजार तंत्रज्ञ आहेत. म्हणून हा देश महाशक्ती होईल, असं ज्यांना वाटतं, त्यांनी ह्या महाकाय देशातील लोकसंख्येच्या बुजबुजाटी जनतेचं अंतरंग नीट पाहिलं नसावं. जातिभेद, धर्मभेदाच्या, घोर विषमतेच्या, भ्रष्टाचाराच्या घाणेरड्या दलदलीत गळ्यापर्यंत बुडालेल्या या देशाचं डोकंच तेवढं अजून बुडालेलं नाही. पण हातपाय हलवण्याचं स्वातंत्र्य त्याने गमावलं आहे. हे कटू सत्य ही थोर माणसं का लक्षात घेत नाहीत? ह्या दलदलीच्या एका काठावर अमेरिकेसारखी राक्षसी राष्ट्र जागतिकीकरणाचे, विविध बंधनात्मक करारांचे सोटे आमच्या टाळक्यावर हाणीत आहेत. तर दुसऱ्या काठावर धर्मांध अतिरेकी आमच्या डोक्याला बॉम्बची माळ बांधत आहेत. हे कमी म्हणून, नोकरशाहीच्या जळवा आमचं रक्तशोषण करून मस्तवाल होत आहेत. अशा परिस्थितीत महाशक्ती होण्याचं नावही घेणं शक्य नाही.

अशा वेळी मुळात चूक कुठे झाली, ते शोधलं पाहिजे. स्वतःला जेते म्हणवणारे आर्य जेव्हा खाऊन- पिऊन तुस्त होते. तोपर्यंत ते जेतेच होते. पण आपणाला ह्या भूमीत अनेक सुखं मिळताहेत, ही कोणा अज्ञात शक्तीची कृपा आहे आणि आपण कृतज्ञपणे त्या शक्तीला काही अर्पण केलं पाहिजे. या विचाराचा किडा त्यांच्या मनात वळवळला आणि आर्य यज्ञयागात, शास्त्राभ्यासात, अध्यात्मात गुरफटत गेले. त्यातून संचित, भाग्यवाद, हे सारं वाढत गेलं. लढाऊ मानसिकता मंत्रांचा जप करण्यात दंग झाली आणि आर्य बेशिस्तीमुळे रानटी टोळ्यांचे गुलाम झाले. एक विचारवंत लिहितो, 'आपली मानसिकता आणि ती घडवणाऱ्या आपल्या तत्त्वज्ञानामध्ये, धर्मांधपणामध्ये, अंधश्रद्धेमध्ये आणि दैववादी वृत्तीमध्ये आपल्याला डोकावायला हवं. विज्ञानाच्या प्रगतीसाठी सर्वप्रथम आपलं मन आणि आत्मा याच्याबाहेर स्वतंत्रपणे बाहेरचं जग असतं. त्याला काही स्वतंत्र नियम असतात. अशी जडवादी भूमिका प्रथम मानली पाहिजे. हे जगच मिथ्या आहे असं मानलं, तर त्याचे नियम आपण काय शोधणार ?'

अर्थात, इहवादी नसणं आणि विज्ञाननिष्ठांचा अभाव हीच आमच्या बेशिस्तीची कारणं आहेत. आकाशाकडे डोळे लावून जगणाऱ्याला पोटात अन्न, डोक्यावर छप्पर आणि कमरेला वस्त्र आहे की नाही, याचं तरी भान कुठून असणार? वरील विचारवंत पुढे म्हणतो, एकीकडे इंजिनीयर व्हायचं, आधुनिक विज्ञान शिकायचं आणि प्रमोशन मिळवण्यासाठी शिर्डीला जायचं. देवळं बांधायची आणि देव रस्त्यावर आणून दंगली करायच्या. काळा पैसा पचावा म्हणून आराधना करायची? ही मध्यमवर्गीयांची बेशिस्त.

अडाण्यांची बेशिस्त तर आणखी वेगळी. लाखो हुशार मुलं गुरं राखताहेत. भीक मागताहेत. दारूत वैफल्य बुडवताहेत, ३०-३५ टक्के लोकांना रोजचं खायलाच मिळत नाही. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन, महात्मा गांधी जयंती, बालदिन काही काही माहीत नसणारी सत्तर-ऐंशी कोटी माणसं शिस्त पाळणे म्हणजे काय, हे कसं काय समजू शकतील? बेशिस्तीचं हे विराट दर्शन भयभीत करणारं आहे.

२०२० पर्यंत नव्हे ३०२०, ४०२० पर्यंतसुद्धा भारत देश जगात महासत्ता होऊ शकणार नाही, हे खेदाने नमूद करावं लागतं. उलटपक्षी या देशाचे खलिस्तान, नक्षलीस्तान, आदिवासीस्तान, दलिती- स्तान असे राजकीय आणि ब्राह्मणदेश, मराठादेश, वैश्यदेश असे जातिनिहाय तुकडे नाही पडले, तर मेहेरबानीच झाली म्हणायची. तिकडून पाकव्याप्त काश्मीर आणि इकडे चीनने गिळलेला प्रदेश हे पुन्हा जमेला आहे. सगळा बेशिस्तीचा कहरच झाला आहे. या देशाला बेशिस्तीतच जमेल तसं जगावं लागणार असं दिसतं; म्हणूनच समजून घेऊ-

शिस्त हे जीवन । बेशिस्त हा मृत्यू
शिस्त आहे वस्तू। अमोलिक ॥। १
इहवादापोटी । जन्मतसे शिस्त
बुद्धीवर भिस्त । असे तिची ॥२
शिस्तीचे रोपटे । सुखात वाढते
गरिबीत जाते । सुकूनिया ॥ ३
शिस्तीतून सुख । येतसे निश्चित
शिस्तीची सोबत । करी सौख्य ॥४
शिस्त ज्याच्या अंगी। होतसे तो मोठा
व्यवहारी तोटा । त्याच्या न ये ॥५
शिस्तीनेच सुखे । होती मजबूत
विरून जातात । बेशिस्तीने ॥६
देवाने, दैवाने । शिस्त बिघडते
अध्यात्माने होते । शिस्त नष्ट ॥७
देव, श्रद्धा, भक्ती । आणि देवाचार
सारे मुक्तद्वार। बेशिस्तीचे ॥ ८
शिस्तहीन राष्ट्रे । गुलाम होतात
दैन्य भोगतात । निश्चित ती ॥ ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# पर्यटन; सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा 'आधारस्तंभ'


जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन "२७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस" साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते. भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन, नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे, देवी-देवतांची नामांकित स्थळे, ताजमहल, कुतुबमिनार, बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन "ह्युस्टन"येथील "हाऊदी मोदी"कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर, पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा "स्टॅच्यु ऑफ युनिटी" भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार, ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव-दानव, ऋषि-मुनी, साधु-संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व विविध धर्माचा इतिहास अशा अनेक वेगवेगळया पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळया पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये. यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. याला नाकारता येत नाही. सरकारने स्वतःचे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे. यातच महाराष्ट्राचा गौरव आहे. यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल. कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे. भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला) "पर्यटनसिटी" म्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे. कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते. आज संपूर्ण विश्र्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे. यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल, प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल. या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने "संकल्प" केला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते. विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते. परंतु जानेवारी २०२० पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना "ग्रहण" लावल्याचे आपण पहाले."अतीथी देव भव" म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले. त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी "चीन विषेला साप" झाला आहे. जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात.कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी, वन्यप्राणी, पशुपक्षी, स्थल, जल, वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सवोतीपरी सहकार्य करण्याची गरज आहे.पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा, आकांक्षा, नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे. यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# पंजाबने दिले ₹५०,०००/- मात्र महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची चेष्टा ?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अनेक भागांमध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सोलापूर, मराठवाडा, विदर्भ, कोकणसह अनेक जिल्ह्यांत ओल्या दुष्काळाचे संकट उभे राहिले असून, शेतमालाचे संपूर्ण नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत मदतीच्या घोषणांमध्येही मोठा भेदभाव दिसून येत आहे, असा आरोप आता सोशल मीडियावर



जोरात होत आहे.

पंजाब सरकारने शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ₹५०,००० ची भरपाई जाहीर केली आहे, तर महाराष्ट्र सरकारने केवळ ₹८,००० इतकी मदत जाहीर करून शेतकऱ्यांच्या भावनांची चेष्टा केली असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

देशातील सर्वात श्रीमंत राज्य असलेल्या महाराष्ट्राकडून अशी तुटपुंजी मदत ही दुर्दैवी बाब आहे. जे राज्य देशाच्या तिजोरीत मोठा वाटा उचलतं, तिथल्या शेतकऱ्यांना अशा क्षणी योग्य न्याय मिळायला हवा होता," असे मत अनेक नेत्यांनी आणि अभ्यासकांनी व्यक्त केलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणसिस यांनी राज्यातील आमदार, खासदार आणि मंत्र्यांनी एका महिन्याचा पगार पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी द्यावा, असे आवाहन केले. मात्र, सोशल मीडियावर यावरही जोरदार प्रतिक्रिया उमटत आहेत.

"एका महिन्याचा पगार देण्यापेक्षा, आमदार, खासदार आणि मंत्र्यांनी एका महिन्याच्या 'टक्केवारी'तून फक्त १% जरी दिला, तरी राज्याच्या तिजोरीपेक्षा जास्त रक्कम जमा होईल," अशी टीका सोशल मीडियावर करण्यात येत आहे. ही टीका भ्रष्टाचार आणि कमिशनखोरीवर मार्मिक भाष्य करत आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी केवळ पंचनामे, प्रतीक्षा आणि आश्वासने नव्हे, तर तात्काळ आणि पुरेशी आर्थिक मदत दिली जावी, अशी जोरदार मागणी राज्यभरातून होत आहे. पंजाब सरकारचा आदर्श समोर असताना, महाराष्ट्र सरकारनेही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठोस आणि निर्णायक पाऊल उचलावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वात्रटिका

### आश्वासनाची मदत

ते आले, त्यांनी पाहिले
ते बोलले आणि ते गेले...
काही दिवसांनी पुन्हा
आम्ही म्हणणार काय झाले...
बोललेले लक्षात नाही रहात
वेळ टळली, संकट टळलं...
कोणाचं काय जातं,त्यालाच
माहित ज्याचं काही जळलं...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# 'पिकं वाहून गेली, कर्ज डोक्यावर विवंचनेत दोन शेतकऱ्यांचा जीवनप्रवास संपला'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** मुसळधार पावसाने सोलापूर जिल्ह्याला अक्षरशः झोडपून काढलं आहे. नद्या-नाले, तलाव तुडुंब भरून वाहत आहेत. शेकडो गावे जलमय झाली असून हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आलं आहे. शेतीपिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीच्या छायेतूनच बार्शी तालुक्यातील दोन गावांमध्ये एकाच दिवशी दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या धक्कादायक घटना समोर आल्या असून, संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.


एकाच दिवशी दोन शेतकऱ्यांनी संपवली जीवनयात्रा

### दहिटणे गावातील घटना झ लक्ष्मण गवसाने यांची आत्महत्या

बार्शी तालुक्यातील दहिटणे गावातील लक्ष्मण काशिनाथ गवसाने (वय 58) हे अल्पभूधारक शेतकरी होते. त्यांच्या दीड एकर कोरडवाहू शेतीत सलग पावसामुळे पाणी साचून पिकांचे मोठे नुकसान झाले. याशिवाय ते शारीरिक आजाराने त्रस्त होते. मानसिक तणावामुळे ते गप्प राहू लागले होते. 23 सप्टेंबर रोजी दुपारी "बाजारात जातो" असे सांगून घरातून बाहेर पडले; परंतु ते परतलेच नाहीत. दुसऱ्या दिवशी म्हणजेच 24 सप्टेंबर रोजी सकाळी गावातील शेतात त्यांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. या घटनेने गवसाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### कारी गावातील घटना झ शरद गंभीर यांचा मृत्यू

दुसरी घटना कारी गावात घडली. येथील शेतकरी शरद भागवत गंभीर (वय 45) यांच्याकडे साडेतीन एकर शेती होती.

त्यांनी पेरू आणि लिंबूची बाग घेतली होती. मात्र, सलग मुसळधार पावसामुळे ही बाग पाण्याखाली जाऊन पूर्णपणे नष्ट झाली. गंभीर यांच्यावर बँकेचे सात लाख आणि गावातील लोकांचे सुमारे तीन लाख असे एकूण दहा लाख रुपयांचे कर्ज होते. उत्पन्नाची कोणतीही शक्यता नसल्याने आणि कर्जफेडीची प्रचंड विवंचना असल्याने त्यांनी गायीच्या दावणाची दोरी गळयात घालून आत्महत्या केली.

### पोलिस तपास आणि स्थानिकांची मागणी

दोन्ही घटनांची नोंद स्थानिक पोलिस ठाण्यांमध्ये आकस्मिक मृत्यू (AD) म्हणून करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे शेतकरी वर्गात हळहळ व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांसह नागरिकांनी तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात स्वच्छता ही सेवा उपक्रम संपन्न



**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक २५ सप्टेंबर रोजी स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ व पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त एक दिन, एक घंटा, एक साथ राष्ट्रस्वच्छता अभियान मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी उपस्थित द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना स्वच्छता ही सेवा संकल्पना समजून सांगितली. यानंतर राष्ट्रीय सेवा योजना एककातील स्वयंसेवकांना स्वच्छता ही सेवा दिनाची शपथ स्वयंसेवक निखिल मम्हाणे याद्वारे देण्यात आली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त एक दिन, एक घंटा, एक साथ या घोषवक्या अंतर्गत सर्व स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात श्रमदान केले.

यात प्रामुख्याने प्लास्टिक संकलन आणि कचरा व्यवस्थापन यावरती काम करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचा समारोप रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. उपक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वच्छता ही सेवा उपक्रम यशस्वी राबविण्यासाठी मीनाक्षी नाईकनवरे, अभिजीत नारायणकर, अजिंक्य ढोरे आणि द्वितीय वर्षातील सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# भीमा नदीचा रुद्रावतार, हजारो एकर शेती पाण्याखाली

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीला पूर आला आहे. नदी आता धोकापातळी ओलांडून वाहत आहे. महाराष्ट्रातील उजनी, सेना आणि वीर धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील अनेक गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. नदीच्या या रुद्रावतारामुळे हजारो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. परिणामी शेतकऱ्यातून चिंता व्यक्त होत आहे. तसेच पुलांवर पाणी आल्याने महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने वाहनधारक चिंतेत आहेत.



भीमा नदीवरील महाराष्ट्र आणि कर्नाटकातील एकूण 9 बंधाऱ्यांवर पाण्याचा प्रवाह धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबळी गावाजवळील सेना नदीवरील पूल पूर्णतः पाण्याखाली गेला आहे. परिणामी, राष्ट्रीय महामार्गावर पाणी शिरल्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक दळणवळण पूर्णतः खंडित झाले आहे. सेना, उजनी व वीर धरणांमधून एकत्रितपणे 2.5 लाख क्युसेकपेक्षा अधिक पाणी भीमा नदीत सोडण्यात आले. त्यामुळे सेना नदीच्या महापुरामुळे महाराष्ट्रातील अनेक गावे संकटात सापडली आहेत. विजापूर जिल्ह्यातील इंडी तालुक्यातील हिंगणी बंधाऱ्यापासून काही गावांमध्ये पुराची शक्यता असून प्रशासन सतर्क आहे. हजारो एकर शेती पाण्याखाली गेली आहे. भीमा नदीच्या पुरामुळे दोन्ही राज्यांतील नदीकिनाऱ्यावरील हजारो एकर शेतीतील ऊस, तूर, कापूस, केळी इ. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. स्थानिक आमदार व अधिकाऱ्यांनी पूरग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर,सात रस्ता,कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर-४१३००३**

**ई-निविदा सुचना क्रमांक २३ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**

**"बी-२, निविदा"**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालीली कामा करिता बी-२ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत: अक्कलकोट निमगाव हत्तीकणबस चिक्कहळळी सलगर भोसगा ते राज्य सीमा रस्ता प्र.जि.मा. १५६ कि.मी. ०/०० ते २१/०० ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. | बी-२ निविदा | १९,४८,९६,८०७/- | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील नोंदणी अनिवार्य नाही |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि.२६/०९/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि.०३/१०/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | निविदा पूर्व बैठक ३०/०९/२०२५ मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नविन मध्यवर्ती इमारत पुणे-१ यांचे कार्यालयात १२.३० वा. सदर निविदा पूर्व बैठक (online via link generated). व्दारे होणार आहे. |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि.०३/१०/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा :- शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर ''बीड लॉक'' झाल्यानंतर ७२ तासात ''हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १.मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि.०६/१०/२०२५ मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in (सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) ३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(डीजीआयपीआर-२०२५-२६/क्र-५/सी२७४१)

# खराब रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करा युवक काँग्रेस मागणी



**पंढरपूर- (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक व अर्बन बँक ते कॉटेज हॉस्पीटल जाणारा रस्ता या अत्यंत आवश्यक असणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. तसेच अर्बन बँक ते एस.टी. स्टॅन्डकडे जाणारा रस्ता व शहरातील सर्व रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. नागरिकांना व शहरात येणा-या भाविकांना या रस्त्यांवर असलेल्या खड्डयामुळे ये जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.मागील तीन महिन्यापुर्वी युवक काँग्रेसच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. त्यावेळेस मुख्याधिकारी यांनी लवकरात लवकर रस्ते दुरूस्त करून घेतो असे आश्वासन दिले होते. परंतु आषाढी यात्रेच्या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये निधी येवुन सुध्दा रस्त्याची कामे निकृष्ठ दर्जाची करण्यात आली.तरी शहरातील रस्त्यांची दुरूस्ती लवकरात लवकर करण्यात यावी तसेच रस्त्यावरील खड्डे न बुजविल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा युवक काँग्रेस आय पंढरपूरचे शहराध्यक्ष संदिप शिंदे यांनी मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी पंढरपूर तालुकाध्यक्ष संदिप पाटील , पंढरपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर सुर्यवंशी, सेवा दल शहराध्यक्ष गणेश माने, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष सोमनाथ आरे , युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष रवि अग्रवाल, संग्राम मुळे, अक्षय वनसाळे, सामाजिक कार्यकर्ते मारूती धोत्रे, काँग्रेस सोशल मिडीया शहराध्यक्ष महेश अधटराव, राजाभाऊ सुरवसे, आण्णा पवार, अजित जगताप, रोहित सरवदे आदि उपस्थित होते.

# लिंगायत समाजाच्या सभागृह व स्मशानभूमीसाठी निवेदन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** जगद् ज्योती महात्मा बसवेश्वर सभागृह निमार्णासाठी व रूद्र भूमी स्मशानभूमीच्या सुधारणा व सुशौभिकरण होण्यासाठी नातेपुते येथील विरशैव लिंगायत समाजाच्या वतीने नातेपुते नगरपंचायत यांना लेखी निवेदन नातेपुते नगरपंचायतचे नगराध्यक्ष अनिता लांडगे उपनगराध्यक्ष अतुल पाटील, माजी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख यांना देण्यात आले. दिलेल्या निवेदनाच्या सर्व मागण्या बाबत योग्य ती दखल घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन नगरपंचायतीने दिले आहे.

यावेळी माजी सरपंच अमरशिल देशमुख, विरशैव समाजाचे महेश शेटे.संदीप गटकुळ.रोहित शेटे.सुर्यकांत रायचूरे.प्रशात कथले . सचिन गटकुळ.शिवानंद भद्रे.योगेश लाटणेकर.अमोल नायकुले.योगेश डोंबे.शशिकात होडगे.शेखर शेटे. रामचंद्र कारंडे.राजु कुरे अभिजीत म्हामणे सर्व समाज बांधव व विश्व हिंदू परिषदेचे गणेश पागे निवेदन देण्यासाठी उपस्थित होते.

# माढा व बार्शी तालुक्यातील पूरग्रस्त गावांची मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडून पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील लव्हेगाव व म्हैसगाव बार्शी तालुक्यातील पुरी, कारीनारी या गावांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केली. नदीकाठावरील गावे पुरामुळे खूप मोठ्या प्रमाणात बाधित झाली असून शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीची मदत लवकरच देण्याचे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना दिले.

यावेळी गोगावले यांनी सांगितले की, पूर ही एक नैसर्गिक आपत्ती असून, शासन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. अतिवृष्टीमुळे माढा व बार्शी तालुक्यातील जवळपास सर्वच मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेती व मालमत्तेचे नुकसान झाले आहे. प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या पाहणी दौऱ्यात तहसीलदार संजय भोसले व जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले, बार्शी तहसीलदार एफ. आर. शेख तसेच शेतकरी, नागरिक उपस्थित होते.

# भीमा कारखान्याकडून उर्वरित ऊस बिल २८०० रु. प्रमाणे सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा - चेअरमन विश्वराज महाडिक



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भीमा सहकारी साखर कारखान्याकडे गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या उसाचे प्रतिटन २८०० रुपये याप्रमाणे उर्वरित ऊस बीलाची रक्कम सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडीक यांनी दिली आहे.भीमा कारखान्याकडे इथेनॉल आणि डिस्टिलरी प्रकल्प नसूनही भीमाने आजवर उपपदार्थ निर्मिती करणाऱ्या कारखान्यांच्या बरोबरीने ऊस दर दिला आहे. राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचा येणारा गळीत हंगाम सक्षमपणे सुरू करून या हंगामातही भीमा कारखाना गाळपास येणाऱ्या उसाला सर्वांच्या बरोबरीने दर देण्यास कटिबद्ध आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# नातेपुते येथील ग्रीन आर्मीचे पूरग्रस्थांसाठी मदतीचे आवाहन


**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** येथील ग्रीन आर्मी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना मदत कार्य करीत आली आहे. सध्या सोलापूर जिल्हयातील पूरग्रस्थ परिस्थिती निर्माण झाली असून अनेक कुटुंब विस्कळीत झाले आहे. पूरग्रस्तांना मदत म्हणून नातेपुते येथील ग्रीन आर्मीच्यावतीने रुग्ण कल्याण समिती सदस्य ग्रामीण रुग्णालय नातेपुतेचे संदिप ठोंबरे, उपनगराध्यक्ष अतुल पाटील, सदा दोलतोडे, राहुल बोराटे, शब्बीर नदाफ, रुपेश भरते, सागर देवडे यांच्याशी संपर्क साधून ठोंबरे फर्निचर दहिगावरोड नातेपुते येथे मदत म्हणून जीवनावश्यक साहित्य यामध्ये तांदूळ, गहू, ज्वारी, डाळी, पोहे, कडधन्या, तेल, साखर, पाणी बॉटल, फरसाणा, पुरुष, महिला व मुलांचे कपडे ब्लँकेट्स,बेडशीट्स, रेनकोट, वैद्यकीय व प्राथमिक औषधे, आयोडिन, टॅब्लेट्स मुलांसाठी आवश्यक शालेय साहित्य तसेच रोख रक्कम स्वीकारण्यात येणार आहे.

तरी नातेपुते व परिसरातील नागरिकांनी एक हात मदतीचा म्हणून वरील ठिकाणी जीवनावश्यक वस्तू जमा करण्याचे आवाहन नातेपुते ग्रीन आर्मीच्या वतीने करण्यात आले आहे. यामध्ये संपूर्ण पारदर्शकता ठेवून ही आर्थिक मदत सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना देण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बांधवांवर दुखःचा डोंगर कोसळला आहे. घरे, संसार, शेती सगळं काही डोळ्यासमोर वाहू गेलं, आज त्यांना मदतीची नितांत गरज आहे. एक छोटीशी मदतही त्यांच्यासाठी आशेचा किरण ठरु शकते. नातेपुते ग्रीन आर्मीच्यावतीने नागरिकांना आवाहन करून जमा करण्यात येणारे जीवनावश्यक साहित्य व इतर संसारिक वस्तूची मदत पूरग्रस्तांना देण्यात येणार आहे. ही मदत त्यांच्यासाठी खूप मोठा आधार ठरणार आहे.

**संदिप ठोंबरे** (रुग्ण कल्याण समिती सदस्य ग्रामीण रुग्णालय नातेपुते)

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 65

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 4 | 9 | | | 1 | |
| 7 | 4 | | | 1 | 8 | | | |
| 1 | 9 | 6 | 7 | | | | 2 | 4 |
| | | | 5 | | 1 | 7 | 6 | 2 |
| | | 3 | | 2 | 7 | | 5 | 9 |
| | | | | 4 | | 3 | | |
| | 7 | 8 | 9 | | | | | |
| 4 | 2 | 9 | | | | | 7 | 3 |
| | | | 3 | 7 | | | 9 | 8 |

